# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/02/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 9 कि. मी. अंतरावर खुमारी टोलनाका येथे दिनांक 09/02/2021 चे 15.00 वा. ते 17.00 वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एच. आर– 55/टी– 1214 क्रमांकाच्या कंटेनरला थांबवुन तपासणी केली असता कंटेनर मध्ये एकुण 60(बैल) कि. 4,80,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. त्यापैकी 6 जनावरे मृत स्थितीत आढळुन आले. आरोपी नामे– 1) साउद उस्माण खान, वय 31 वर्षे, रा. सोनिया गांधी कॉलनी ऐशबाग स्टेडीयम भोपाल म.प्र., 2) आझम पप्पिरीयाज बक्ष, वय 31 वर्षे, रा. बाफरद तब्झा, भोपाल म.प्र., 3) अझरूदीन वाहीद खान, वय 26 वर्षे, रा. भोरसा ता. बेरशिया जि.भोपाल म.प्र. व 4) आबिद कमरअली खॉन, वय 18 वर्षे, रा. सिरोंच ता. नटेरन जि. विदीशा म. प्र. यांच्या ताब्यातुन 60 जनावरे व वाहनासह एकुण किंमती 14,80,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई श्री. रूपेश शेंडे, पो.स्टे. रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(अ)(ड)(इ)(फ) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(1)(2),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 119,130,178 मोवाका सहकलम 429 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रमोद राउत 9881683184 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी रामटेक श्रीमती नयन आलुरकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री प्रमोद मकेश्वर, पोउपनि श्री प्रमोद राउत, पोशी गोविंदा खांडेकर, रूपेश शेंद्र, बांते, आकाश यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर